जावक क्रमांक १६३४ /२०१९
कोथरूड पोलीस स्टेशन पुणे
दिनांक :-२५/०३/२०१९

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.
यांना सविनय सादर.

प्रतिवेदक :- पी.एन.जर्दे,पोलीस उपनिरीक्षक, कोथरूड पोलीस स्टेशन,पुणे शहर.
याजं कडून विनंती पुर्वक,

विषय :- अनोळखी मयताचे वारसाचे तपासकामी सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी होणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, कोथरूड पो.स्टे.गु.र.नं. ९७/२०१९ भा.दं.वि. कलम २७९,३०४(अ), मोटार वाहन कायदा कलम-११९/१७७, १८४ मधील फिर्यादी नामे श्रावण रामभाऊ शेवाळे,वय-३३वर्षे,पोलीस शिपाई, बक्कल नंबर ८५५० नेमणूक कोथरूड पोलीस ठाणे पुणे शहर यांनी फिर्याद दिल्यात मजकूर की,दिनांक २०/०२/२०१९ रोजी सकाळी ०६/३० वा.चे सुमारास यातील आरोपी नामे शंकर जनार्दन कदम,वय-४७ वर्षे,धंदा-ड्रायव्हर,रा.स.नं ५४/०१,मोहिनी कुंज अपार्टमेंट,रुम नं-२०,सुलोचना कुदळे कमानीजवळ,वडगाव बुद्रुक,पुणे यांनी त्यांचे ताब्यातील बस ही हयगयीने, भरधाव वेगाने चालवुन वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे चालवुन खालील वर्णनाचा अनोळखी इसम,वय ३० ते ३५ वर्षे अंदाजे यांना धडक देऊन त्यांचे छातीस,खांद्यास,डोक्यास मार लागून गंभीर जखमी करुन अनोळखी इसमाचे मृत्युस कारणीभुत ठरला म्हणून सरकारतर्फे फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल आहे. सदर अनोळखी मयत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षाचा,काळया फिक्कट रंगाची पँट त्याचे आतील
बाजूस मेड इन इंडिया इंग्रजीत लिहिलेले, उजवे हाताचे मनगटात काळया रंगाचा दोरा
अंगाने मध्यम, रंगाने काळा, अंदाजे उंची ५/३, चेहरा गोलाकार, केस काळे बारीक कापलेले
दाढी केलेली,नाक बसके, कान बारीक, डावे हाताचे पोटरीवर इंग्रजीमध्ये अस्पष्ट
उजवे हाताचे पोटरीवर सुरजकिरण मराठीत गोंदलेले

तरी वरील अनोळखी व्यक्तिचे नातेवाईकांचा / वारसाचा तपास होणे कामी सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.